मनुष्याच्या
इच्छाशक्तीपेक्षा
मोठी शक्ती
दुसरी नाही.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार २६ मे २०२५ | अंक १६३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येणार?

## सुनेत्रा पवारांनी स्पष्ट सांगितल



गेल्या ... दिवसांपासून राष्ट्रवादी अजित पवार गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट हे दोन्ही पक्ष पुन्हा एकदा एकत्र येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. एकीकडे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू आहे, तर दुसरीकडे दोन्ही पवार देखील एकत्र येणार असल्याची चर्चा होत आहे. यावर आता राष्ट्रवादीच्या खासदार सुनेत्रा पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे, त्या पंढरपूरमध्ये महिला मेळाव्यात बोलत होत्या. वैष्णवी हगवणे प्रकरणावर प्रतिक्रिया दरम्यान पुण्यातील विवाहिता वैष्णवी हगवणे हीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे, सासरच्या छळाला कंटाळून तिने आत्महत्या केल्याचा आरोप होत आहे, या घटनेनं संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे, यावर देखील सुनेत्रा पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. वैष्णवी हगवणे बाबत झालेल्या घटनांचे समर्थन करत नाही, अशा घटना व्हायला नको आहेत. पक्षाने याबाबत भूमिका मांडलेली आहे. महिला आयोगाकडून दिरंगाई होते याबाबत सुद्धा पक्षाच्या पदाधिकाऱ्याने भूमिका मांडलेली आहे, अशी प्रतिक्रिया या प्रकरणावर सुनेत्रा पवार यांनी दिली आहे. लाडकी बहीण योजनेवर प्रतिक्रिया ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखांच्या आत आहे, अशा कुटुंबातील महिलांसाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आहे, या योजनेंतर्गत महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा केले जातात. मात्र अजूनही वाढीव रकमेबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, यावर बोलताना सुनेत्रा पवार यांनी म्हटलं

**नेमकं काय म्हणाल्या सुनेत्रा पवार?**
राजकारण आणि कुटुंब या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत, दोन्ही पक्ष एकत्र येणार ही फक्त चर्चा आहे. जे काही होईल ते आपण बघालच असे म्हणत दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणारवर प्रतिक्रिया देताना सुनेत्रा पवार यांनी हात जोडत, या विषयावर अधिक बोलणं टाळलं आहे.



# कृषिभूषण शिवराम घोडके यांचा मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते

# महाराष्ट्र महा गौरव पुरस्काराने सन्मान




प्रतिनिधी | बीड प्रगतशील शेतकरी, सेंद्रिय व नैसर्गिक शेतीचा प्रचार प्रसार करणारे तसेच महाराष्ट्र शासनाचा कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शिवराम घोडके यांचा पुण्यात राज्याचे तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते महाराष्ट्र महा गौरव पुरस्कार देवून समान्मानित करण्यात आले. यावेळी ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, आयुष्यमान भारत महाराष्ट्र समिती अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कृषिभूषण शिवराम घोडके यांना कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल महाराष्ट्र महा गौरव पुरस्कार २०२५ जाहिर झाला होता. या पुरस्काराचा वितरण सोहळा रविवार दि. २५ मे रोजी सकाळी ११ वाजता पुण्यातील जे डब्ल्यू मॅरिएट हॉटेल येथे मोठ्या थाटात संपन्न झाला.

डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना, महाराष्ट्र च्या वतीने महाराष्ट्र महा गौरव २०२५ राज्यस्तरीय पुरस्कारासाठी बीडचे प्रगतशील शेतकरी, सेंद्रिय नैसर्गिक शेतीचा देशभर प्रसार व प्रचार करणारे तसेच महाराष्ट्र शासनाचा कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शिवराम घोडके यांची निवड करण्यात आली होती. शिवराम घोडके हे प्रयोगशील व प्रगतशील शेतकरी म्हणून आदर्श कार्य करत आहेत. नव्या पिढीतील नवा दृष्टिकोन घेऊन परिश्रम करणारा शेतकरी म्हणून शिवराम घोडके यांच्याकडे पाहिले जाते. सेंद्रिय शेती क्षेत्रातील त्यांचे कार्य ग्रामीण महाराष्ट्रासाठी दिशादर्शक आहे. ग्रामविकासातील महत्वाच्या योगदानाबद्दल त्यांचा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते व ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, आयुष्यमान भारत महाराष्ट्र समिती अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला. शिवराम घोडके यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# पत्रकारांना धमकी देणाऱ्या आ.बाबुराव कदमांवर गुन्हा दाखल करा -जिल्हाध्यक्ष अशोक होळकर

## अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने जाहीर निषेध



बीड / प्रतिनिधी नांदेड जिल्ह्यातील पत्रकार संजय सुर्यवंशी यांना बातमी का छापली म्हणत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याचे धमकी देणाऱ्या आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष अशोक होळकर यांनी केली आहे , पत्रकारांवर दबाव टाकून आवाज दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्या आमदारांचा अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ बीड शाखेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे .दैनिक देशोन्नती तालुका प्रतिनिधी तथा मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष यांना दिनांक 22 मे 2025 रोजी निवधा तळणी सर्कल मधील 25 गावे 25 तासांपासून अंधारात या मथळ्या खाली वृत्त प्रकाशित केले वास्तविक पाहता या बातमीत आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या नावाचा साधा उल्लेखही नाही तरी सुद्धा पत्रकारांना संपविण्याची असंविधानिक भाषा वापरणाऱ्या आमदार कदमावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अशोक होळकर मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष अनिल देवा कुलकर्णी ,जिल्हा कार्याध्यक्ष दत्तात्रय नरनाळे ,जिल्हा सचिव विठ्ठल घरत,प्रदीप आनेराव ,अस्लम पठाण ,सिध्दांत खवतड, अंकुश पवार,यांनी केली आहे.

# अष्टपैलू व्यक्ती आम्ही मुंबईकरचे मुख्य संपादक प्रमोद न सूर्यवंशी यांना आदर्श संपादक पुरस्कार जाहीर



मुंबई प्रतिनिधी सुचित्रा कुंचमवार मुंबईतली अग्रगण्य साप्ताहिक आम्ही मुंबईकर चे संपादक प्रमोद सूर्यवंशी यांना जॉय ऑफ गिविंग संस्थेचा आदर्श संपादक पुरस्कार नुकताच जॉय चे अध्यक्ष संस्थापक गणेश हिरवे यांनी जाहीर केला आहे . येत्या ७ जून रोजी जोगेश्वरी पूर्व स्थित अस्मिता भवन हॉल मध्ये प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीती तो प्रदान करण्यात येणार आहे. हे कविता तसेच चित्रपट निर्माता अनेक कलागुणांनी देखील असून या आधी देखील त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक अवॉर्ड मिळालेले आहेत.जॉय चा पुरस्कार जाहीर झाल्याने प्रमोद न. सूर्यवंशी यांचे अभिनंदन केले असून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. या लहान वयात सुद्धा उंच भरारी घेत आहे. यावेळी विविध क्षेत्रात चांगली कामगिरी करणाऱ्या लोकांना देखील पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये मान्सूनच्या प्रवासाची गती लवकरच कमी होणार असल्यामुळे राज्यात पावसात घट होणार आहे

मुंबई, दि 25: या वर्षी मान्सूनचा प्रवास वेगाने सुरु असल्यामुळे तो 25 मे रोजी दक्षिण कोकणात दाखल झाला आहे, जे सामान्य तारखेपेक्षा 10 दिवस आधीच आहे. मात्र 27 मे पासून मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होणार असल्यामुळे राज्यातील हवामानात लवकरच मोठे बदल दिसून येतील. सध्याच्या अंदाजानुसार 27 मे पासून राज्यातील हवामान हळू हळू कोरडे होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढ देखील होईल. मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे, आणि किमान 5 जूनपर्यंत ही स्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. यामुळे किमान 5 जूनपर्यंत तरी राज्यातील बहुतांश भागात मान्सून दाखल होण्याची आणि मान्सूनच्या पावसाची शक्यता दिसत नाही. या दरम्यान देशातील इतर भागात सुद्धा मान्सूनचा प्रवास तात्पुरता थांबू शकतो. या वर्षी राज्यातील अनेक भागात दमदार मान्सून पूर्वीचा वादळी पाऊस पडला आहे. आपल्या भागात मान्सून लवकरच दाखल होईल अशी अपेक्षा करून अथवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. हवामान कोरडे होणार असल्यामुळे जर पेरणीची घाई केली तर शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# भारत चौथ्या क्रमांकाची जागतिक अर्थशक्ती

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताची ऐतिहासिक घोडदौड- उपमुख्यमंत्री अजित पवार

### उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन

मुंबई, दि. 25: "भारताची अर्थव्यवस्था चार ट्रिलियन डॉलर्सच्या टप्प्यावर पोहोचली असून, आपला देश आज जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थशक्ती ठरला आहे, ही बाब प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची आणि आनंदाची आहे. हे यश प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींच्या सक्षम नेतृत्वाचे आणि सातत्याने घेतलेल्या ठोस निर्णयांचे फलित आहे. त्यांनी दिलेल्या 'विकसित भारत-2047'चे लक्ष्य गाठण्यासाठी महाराष्ट्र पूर्ण क्षमतेने सज्ज आहे. या ऐतिहासिक कामगिरीसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो," अशी प्रतिक्रिया महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या संदेशात म्हणतात की, नीती आयोगाच्या बैठकीनंतर भारताच्या आर्थिक स्थितीबाबत नीती आयोगाचे सीईओ बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारताने जपानला मागे टाकून चौथा क्रमांक पटकावला आहे. आता आपल्यापुढे केवळ अमेरिका, चीन आणि जर्मनी आहेत. ही केवळ आकड्यांची झेप नाही, तर सक्षम धोरणांची, प्रभावी नेतृत्वाची आणि ठोस अंमलबजावणीची प्रचिती आहे. भारताला लाभलेली तरुण लोकसंख्या, नीती आयोगासारख्या संस्थांचे मार्गदर्शन आणि राज्य-केंद्र सरकारमधील प्रभावी समन्वयामुळे येत्या अडीच ते तीन वर्षांत भारत तिसऱ्या क्रमांकाची जागतिक अर्थव्यवस्था होईल. प्रधानमंत्री यांनी सर्व राज्यांना आपापल्या पातळीवर विकासाचे दीर्घकालीन व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला महाराष्ट्राने सकारात्मक प्रतिसाद दिला असून महाराष्ट्र नक्कीच देशाच्या विकासात




आघाडीवर असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय धोरणानुसार, महाराष्ट्र सरकारने सुद्धा 'महाराष्ट्र 2047' असे व्हीजन तीन टप्प्यात तयार केले आहे. 100 दिवसांच्या सुशासन, नागरिक केंद्रीत उपाययोजना आणि उत्तरदायित्त्व अशा सूत्रावर एक कार्यक्रम महाराष्ट्र सरकारने हाती घेतला आहे. यात विविध विभागांनी 700 हून अधिक उद्दिष्ट साध्य केले. आता दीडशे दिवसांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यात 2047 साठी दीर्घकालीन, महाराष्ट्र आपला अमृत महोत्सव साजरा करेल, त्या कालावधीचे म्हणजे 2035साठी आणि प्रतिवर्षाच्या उद्दिष्टांसह 2029 साठीचे अल्पकालिक 5 वर्षांचे असे व्हीजन तयार करण्यात येत आहे. विद्यमान अर्थव्यवस्था 2030 पर्यंत एक ट्रिलियन डॉलर्स करण्याचे मुख्य उद्देश आहे. भारताच्या आर्थिक प्रगतीचे श्रेय देशातील सामान्य जनतेच्या कष्टांना, उद्योग जगताच्या योगदानाला आणि केंद्र सरकारच्या निर्णयक्षम, परिणामकारक नेतृत्वाला जाते. हे यश आपल्याला अधिक व्यापक, समावेशक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरणा देणारे आहे, असे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन करून त्यांचे आभार मानले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २६ मे २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### डोळे उघडे ठेवून जीवन जगावे....

सध्या सर्वत्र एकच बातमीने थैमान घातलेले आहे.सर्व झाल्यावर सगळे जन जागे होतात.जेव्हा प्रत्यक्ष काही अमानुष गोष्टी घडत असतात त्या वेळी त्या गोष्टींकडे कधी कधी जाणून बुजून दुर्लक्ष केले जाते.असे का घडते?तुमच्याकडे पैसे आहे तर,ते जपून वापरा,किंवा ज्यांना त्या पैशाची खरच गरज आहे त्यांना ते द्या.विनाकारण असे लाच/ हुंडा देऊन स्वतःची पोटची मुलगी समोरच्यांना विकु नका.ज्या मुलाला स्वतः पुरते,बायको पुरते कमावता येत नाही..अशा मुलाला स्वतःची मुलगी द्यायची.पैशाची हाव खूप वाईट आहे. पैसा कधीच कोणाला सुखाने जगू देत नाही.मुलीचा अट्टाहास होता त्याच मुलाशी लग्न करायचे तर करू द्यायचे.तेव्हा असे पैसे कशाला उधळायचे.५१ तोळे सोने,फॉच्यूनर गाडी,महागडे फोन,चांदी देण्याची काय गरज होती?

त्याच वेळी असे पैसे नसते दिले तर ही वेळ आली नसती.काय खरे आणि काय खोटे..हे मी सांगू शकत नाही.पण,इतके नक्कीच कळते की आपली मुलीचे लग्न करून देताना एक ही रुपया हुंडा देवू नये. साध्या पद्धतीने विवाह करावा..त्यांनी कोर्ट मॅरेज केले असते.. खरच त्या ही मुलाला हीच मुलगी पसंद असती तर,त्याने असा हुंडा घेतला नसता.जे दिले त्यात समाधानी असणारे कुटुंब सुखी कुटुंब असते.याचा विचार का केला नाही? इतके पैसे येतात कोठून? हाच मोठा प्रश्न पडला...आपली मुलगी विकली... हे ही आई बापाला समजत नाही..प्रेम इतके आंधळे नसावे.

आजकाल लोक नको तेथे, नको तितका पैसा खर्च करतात.हे चित्र थांबले पाहिजे.हुंडा देणे अन् घेणे दोन्ही गोष्टी गुन्हा आहे.इतका त्रास सासरी होत असताना मुलगी का ठाम निर्णय घेत नाही? विभक्त झाली असती तर काय झाले असते? एकत्र कुटुंब पद्धत एकदम सर्वश्रेष्ठ आहे,पण अशा ठिकाणी काय म्हणायचे?मुली नको त्या ठिकाणी अडकल्या जातात? आपले आई वडील आपले लग्न विचार पूर्वकच लावून देतात हे त्यांना का समजत नाही?जेथे पैसा मध्ये येतो,तेथे घात नक्की होतो, हे ९९.९९% खरे आहे.येथे उसने घेतलेले पैसे लोक देत नाही? हे तर किती दूरचे? माणसे ही जनावरे होवू लागले आहे..कोणता सैतान त्यांच्या अंगात घुसतो ते समजत नाही.

आता तरी प्रत्येक पालकांनी जागृत होणे गरजेचे आहे,एक रुपया ही मी हुंडा देणार नाही किंवा घेणार नाही.कोणत्याही स्वरूपात नाही.कोणताच अवास्तव खर्च करायचा नाही.पत्रिका छापणे,बँड पथक लावणे,बायका नाचवने,बुफे जेवण,सत्कार समारंभ,भेट वस्तू देणे..हे सर्व थांबले पाहिजे.लग्नात अक्षदा म्हणून किती तरी तांदूळ वाया घालवतात... खायची गोष्ट पायदळी तुडवली जाते.कमी लोकांमध्ये,शांतपणे असे कार्यक्रम व्हावेत.तो कार्यक्रम कोणताही असो...लग्न,वाढदिवस,निरोप समारंभ इत्यादी.खर्चाला कोठे तरी कात्री लावली पाहिजे.

डोळे उघडे ठेवून जीवन जगावे,असे नाहक बळी जाणार नाही? याची काळजी घ्यावी.आत्महत्या कोणी अशी सहज करत नाही... मानसिक आधार द्यायला शिकावे.एकमेकांना वेळ देत चला,समजून घेत चला,आई वडिलांशी स्पष्ट बोलत जा,कोणत्याच गोष्टी लपवून ठेवू नका,तुम्हाला होणारा त्रास लगेच सांगत चला.प्रत्येक गोष्टींवर उपाय आहेत.अडचण समजली तर उपाय करता येतात.तेव्हा हे जीवन सोपे नाही अन् अवघड ही नाही.ते फक्त आनंदाने जगता आले पाहिजे.काही नसले तरी चालेल..पण,स्वतःचा आनंद कोणाला असा सहज सहजी हिरावून घेऊ देऊ नका.जे सुख देण्यात असते ते घेण्यात कधीच नसते. जीवन दोन घडीचा डाव आहे,तेव्हा ते आनंदाने जगा.सर्वांना समान न्याय हा मिळालाच पाहिजे...अशा किती तरी लेकी असतील त्यांचा ही विचार व्हावा.पण,जेव्हा असे समजते हुंडा दिला गेला,घेतला गेला..त्यावर ॲक्शन घेतलीच गेली पाहिजे.दोन्ही कडील लोकांना शिक्षा ही झालीच पाहिजे.तो हुंड्याचा पैसा मुलीच्या घरच्यांना लगेच देऊन टाकावा.

सौ.प्रतिमा अरुण काळे/ खेमनर
निगडी प्राधिकरण,पुणे ४४

# संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ यांचे सन 2024-25 आर्थिक बजट ची तरतूद करून महामंडळातील जाचक अटी शिथिल करा - नानासाहेब घोडके

## समाजिकन्याय मंत्री संजय सिरसाट यांना निवेदन




माजलगाव दि २५ (बातमीदार) संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाचे सन २०२४ -२५ च्या आर्थिक बजेट ची तरतूद करून महामंडळाच्या जाचक अटी शिथिल करा अश्या मागणिकचे निवेदन बीड जिल्ह्या अध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी सामाजिकन्याय मंत्री संजय सिरसाट यांना माजलगाव येथील सत्कार संरभ प्रसंगी देण्यात आले

महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना संजय सिरसाट यांचा माजलगाव येथील बहुजन समाज बांधवाच्या वतीने जाहीर सत्काराचे आयोजन दि. 24/5/2025 रोजी करण्यात आले होते या प्रसंगी त्यांना संत राष्ट्रीय चर्मकार महासंघ बीड च्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की समाजकल्याण विभागाचा निधी इतर खात्यात वळविण्यात आल्याबाबत.

संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळातील कर्ज प्रकरणे २०२३-२४, २०२४-२५ निधी अभावी मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. काही लाभधारकांनी सहभाग भरून देखील त्यांना आजतागायत धनादेश मिळाला नाही. चर्मकार समाज मोलमजुरी तसेच गटई काम करून आपली हलाखीच्या परिस्थितीत उपजीविका चालवीत आहे. त्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी उद्योग धंद्यासाठी कर्जाची अत्यावश्यक गरज आहे. त्यासाठी आपल्या समाजकल्याण विभागामार्फत आर्थिक निधी शासनाच्या इतर योजनासाठी न वळविता संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळास उपलब्ध करून देण्यात यावे.

तसेच शैक्षणिक कर्ज यांना निधी उपलब्ध करून जामीनदाराची अट वगळण्यात यावेत. शैक्षणिक कर्ज प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यात यावेत. सिबिल स्कोर व जीएसटी कोटेशन ची अट रद्द करण्यात यावी.

संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाची सर्व कर्ज प्रकरणे सरसकट कर्जमाफी करण्यात यावेत. बार्टी व आर्टी च्या धर्तीवर संत रोहिदास संशोधन व प्रशिक्षण संस्थेची स्थापना करण्यात यावी. समाजकल्याण च्या वतीने गटई कामगारांना ऊन, वारा,पावसापासून संरक्षण मिळण्यासाठी स्टॉल ची योजना चालू केलेली आहे. २ वर्षापासून गटई कामगारांनी स्टॉल चे प्रस्ताव दाखल केलेले आहेत त्यास तत्काळ मंजूरी देण्यात यावी. मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मध्ये चर्मकार समाजातील घटकांना न्याय देण्यात यावा एनएफडीसी अंतर्गत १० ते ५० लाखांपर्यंत कर्जप्रकरणा चा प्रस्ताव घेऊन वाटप करण्यात यावे. या मागण्याची दखल घेऊन समाजाला न्याय द्यावा अशी विनंती सदरील निवेदनातुन केली आहे

या वेळी जिह्लाध्यक्ष नानासाहेब घोडके , युवा जिह्लाध्यक्ष राजेश जाधव , जिह्ला सचिव ऑड दत्ता जाधव, जिह्ला उपाध्यक्ष बालासाहेब गवळी, जिह्ला संघटक राधाकीसन भाळशंकर, माजी कर्मचारी जिह्लाध्यक्ष अशोक वाडेकर, माजी कार्याध्यक्ष सत्यनारायण उनवणे, तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे, कर्मचारी तालुकाध्यक्ष सिताराम सोनवणे, राजू भैय्या शिंदे, युवा तालुकाध्यक्ष आकाश कांबळे, तालुका उपाध्यक्ष अर्जुन पोहेकर, शहर अध्यक्ष प्रसाद वाघमोडे, शहर उपाध्यक्ष संतोष खंडागळे, शहर सचिव मनोज वाघमारे, वसंत वाघमारे, संतोष जाधव, नारायण पोहेकर, मयूर वाघमारे, ज्ञानेश्वर लोकरे इ. पदाधिकारी उपस्थित होते

# बोगस कृषी निविष्ठ बाबत करा तक्रार - साहिल सय्यद

कडा प्रतिनिधी: जिल्ह्यातील बियाणे, खते व कीटकनाशके यांच्या खरेदी विक्री, गुणवत्ता व पुरवठयाच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणींचे तत्काळ निवारण करण्यासाठी खरीप हंगामासाठी १५ मे ते १५ ऑगस्ट या कालावधीत जिल्हास्तरावर ‘निविष्ठा उपलब्धता व तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे, असे कृषी विभागाने कळविले आहे.

सदर नियंत्रण कक्षाशी दररोज सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत भ्रमणध्वनी क्रमांक ९४०३ ३०८ ६०८ तसेच टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विकास अधिकारी श्री साहिल सय्यद यांनी जिल्यातील सर्व नागरिकांना केले आहे.



जास्त दराने खताची विक्री झाल्यास कारवाई

पुढील काही दिवसात पेरणीच्या कामांना वेग येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी बियाणे खरेदीस सुरूवात केली आहे. बियाणे व खते यात बोगस कंपन्यांच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारचे शेतकऱ्याचे नुकसान होऊ नये याची काळजी कृषी विभागामार्फत घेतली जात आहे. युरिया खत ज्यादा दराने विक्री केल्याचे व युरिया सोबत इतर अनावश्यक खते लिंकिंग करीत असल्याचे निदर्शनास आल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा मोहीम अधिकारी सायप्पा गरांडे यांनी दिला आहे.

तालुक्याशी संपर्क साधा

खते, बियाणे विक्रीदरम्यान काही गैरव्यवहार होत असल्यास शेतकऱ्यांनी स्थानिक कृषी सहायक किंवा तालुक्यातील कृषी अधिकारी, पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

“जिल्हास्तरावर १ व तालुकास्तरावर प्रत्येकी १ असे जिल्ह्यात एकूण १२ भरारी पथके स्थापन केली आहेत. त्याचबरोबर दि. १ जून २०२५ पासून कृषी निविष्ठा संबंधित तक्रार निवारण कक्षबाबत माहीती देणारे फलक प्रत्येक निविष्ठा केंद्रामध्ये दर्शनिय भागावर लावण्याबाबत बंधनकारक करण्यात आलेले आहे. जिल्ह्यातील कृषी विभागाचे पथक बारीक लक्ष ठेऊन आहे.”

साहिल सय्यद
(कृषी विकास अधिकारी, जि. प. बीड)

कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

# शिवसैनिकांनो, तुम्ही पक्ष संघटन मजबूत करा तुम्हाला बळ देण्याचे काम मी करेल- ना. संजयजी शिरसाट

## मंत्री ना. संजयजी शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न!

बीड, प्रतिनिधी- शिवसेना पक्षात कधी जात पाहून काम केलं जात नाही व शिवसैनिक कधीच जात धर्म बघून जनतेचा कामासाठी पुढे जात नाहीत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांचे संस्कार आपल्यावर झालेले आहेत. तसेच महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब यांची स्वाभिमानी विचारधारा घेऊन आपण सर्व शिवसैनिक पुढे वाटचाल करत आहोत. त्यामुळे शिवसैनिकांनी जात-धर्म न बघता केवळ माणूस बघून सर्व सामान्य जनतेचे काम करा, जनतेच्या मनावर तुम्ही अधिराज्य गाजवाल आणि जनता तुम्हाला डोक्यावर घेऊन मिरवेल. तुम्ही पक्ष संघटन मजबूत करा तुम्हाला बळ देण्याचे काम मी करेल. असे महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते संजयजी शिरसाट साहेब यांनी बीड जिल्हा शिवसेनेच्या आढावा बैठकीमध्ये शिवसैनिकांना संबोधित केले. तसेच उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत स्थानिक स्वराज्य निवडणुकांबाबत दिशा स्पष्ट केली.

काल दि. 24 रोजी दुपारी 2 : 00 वाजताच्या दरम्यान बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते मा. ना. श्री. संजयजी शिरसाठ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेनेची अत्यंत महत्वपूर्ण आढावा बैठक मोठया उत्साहात संपन्न झाली. ही बैठक म्हणजे बीड जिल्ह्यात शिवसेना संघटनेच्या मजबुतीचा ठोस पुरावा ठरली. या बैठकीमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी मंत्री महोदय ना. शिरसाट साहेबांचे बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने जंगी स्वागत करत मोठ्या थाटामाटात सत्कार केला. यानंतर मंत्री ना. शिरसाट साहेबांनी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांना संबोधित केले. तसेच या बैठकीसाठी उपस्थित असणारे शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब आणि शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांनी स्थानिक स्वराज्य निवडणुकांबाबत मार्गदर्शन केले. बैठकीचे प्रास्ताविक नवनिर्वाचित शिवसेना तालुकाप्रमुख संतोष जाधव यांनी केले तर बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी आपल्या भाषानातून जिल्ह्याचा आढावा मांडला.

दरम्यान बैठकीत मंत्री महोदय ना. शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले. तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या महिला आघाडी अध्यक्षा जयश्रीताई वाघमारे व बाळासाहेब



खेडकर तंटामुक्ती अध्यक्ष खामगाव गेवराई यांनी मंत्री महोदय शिरसाट यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, युवा सेना मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे, युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहिर, महिला आघाडीच्या सह संपर्कप्रमुख अलकाताई डावकर, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख चंद्रकलाताई बांगर, युवा सेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे, युवा सेनेचे गणेश शिराळे, ओबीसी वी जयंती सेनेचे जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण यांच्यासह शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांनी बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आढावा बैठकीचे सूत्रसंचलन प्रतिक कांबळे यांनी केले.

- - - - -

### शिवसेना नवनियुक्त पदाधिकारी

अमोल दिगंबर जाधव – शिवसेना उपजिल्हाप्रमुख बीड ग्रामीण, संतोष किसनराव जाधव – शिवसेना तालुकाप्रमुख बीड तालुका, ज्ञानोबा जनार्धन गोंडे – शिवसेना तालुकाप्रमुख वडवणी तालुका, गजानन दामोदर कदम – शिवसेना शहरप्रमुख बीड शहर, हनुमंत काशिनाथ शिंदे – शिवसेना शहरप्रमुख वडवणी शहर, सुनील अंकुशराव गवते – जिल्हा सहसंघटकnबीड विधानसभा, केशव बाबुराव घिघे – जिल्हा सहसंघटक माजलगाव विधानसभा. नारायण आप्पासाहेब शिंदे-शिवसेना उपजिल्हाप्रमुख गेवराई, उध्दव ज्ञानेश्वर मडके - शिवसेना तालुकाप्रमुख गेवराई, नवनाथ राजेंद्र गवते - शिवसेना विधानसभा प्रमुख गेवराई, मुकेश अंकुशराव महाजन - शिवसेना शहरप्रमुख गेवराई, सुनिल मोटे -शिवसेना शहरसंघटक गेवराई या सर्व नवनिर्वाचित शिवसेना पदाधिकाऱ्यांना मंत्री ना. संजयजी शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते नियुक्ती पत्रक देण्यात आले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २६ मे २०२५
https://lokaarambh.com



# वाशिममध्ये रेशनचा हजारो क्विंटल गहू पावसात भिजून खराब

### कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे सरकारी धान्याचे मोठे नुकसान



वाशिम (प्रतिनिधी) रेल्वेमार्फत वाशिमला आणण्यात आलेल्या रेशनच्या सुमारे ६५ हजार क्विंटल गव्हापैकी हजारो क्विंटल गहू २३ मेच्या मध्यरात्री झालेल्या पावसात भिजून खराब झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे सरकारी धान्याचे मोठे नुकसान झाले असून, गरजूंना पुरवण्यात येणाऱ्या अन्नसाठ्यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. प्राप्त माहितीनुसार, गहू साठवण्यासाठी आवश्यक ती खबरदारी न घेता माल खुलेआम ठेवण्यात आल्याने हा अपघात घडल्याचा आरोप संबंधित कंत्राटदारावर करण्यात येत आहे. यामुळे शेकडो क्विंटल गहू पावसाच्या पाण्यात भिजून अन्न म्हणून अयोग्य ठरला आहे. २४ मे रोजी मात्र, मजूरांच्या माध्यमातून भिजलेल्या गव्हाची सारवासारव आणि विल्हेवाट लावण्याचे काम सुरू असल्याचे दृश्य पाहायला मिळाले. या प्रकरणात जबाबदारांवर कारवाई होणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## गटशिक्षणाधिकारी अनिल पवार साहेब आणि सहाय्यक अध्यापिका सौ. पवार मॅडम यांना लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा

### शैक्षणिक क्षेत्रातील आदर्श दांपत्याला मानोऱ्यातून शुभेच्छांचा वर्षाव



मानोरा (प्रतिनिधी) मानोरा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी आदरणीय श्री. अनिलजी पवार साहेब आणि एल.एस.पी.एम. हायस्कूल, धामणी (मानोरा) येथील सहाय्यक अध्यापिका सौ. पवार मॅडम यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी छाप उमटवणाऱ्या या आदर्श दांपत्याने समाजासमोर एक उत्तम समन्वय आणि प्रेरणादायी सहजीवनाचा आदर्श ठेवला आहे. विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षण व शिस्तीचे बीज पेरणाऱ्या या जोडीला मानोरा तालुक्यातून अनेक मान्यवर, शिक्षकवर्ग, विद्यार्थी आणि पालकांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. आपल्या सहजीवनात अशीच प्रेमाची, विश्वासाची आणि यशाची साथ अखंड राहो, अशा सदिच्छा सर्वत्र व्यक्त केल्या जात आहेत.

# जागतिक थायरॉईड दिनानिमित्त जनजागृतीचा उपक्रम




(प्रतिनिधी) वंचित बहुजन आघाडी वसर्फा तालुक्याच्यावतीने २५ मे रोजी 'जागतिक थायरॉईड दिना'निमित्त जनजागृतीचा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत नागरिकांमध्ये थायरॉईड विकारांविषयी जागरूकता निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. वंचित बहुजन आघाडी वसर्फा तालुकाध्यक्ष गौतम रघुनाथ मुझमुले यांनी सांगितले की, "थायरॉईड विकार योग्य वेळी लक्षात घेणे आणि तात्काळ उपचार घेणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत हे विकार वाढत असून, त्यासंदर्भात समाजात जागृती होणे काळाची गरज आहे." थायरॉईड ग्रंथीतील बिघाडामुळे वजन वाढणे, थकवा, चिडचिड, केस गळणे, निद्रानाश आदी त्रास होऊ शकतात. यावर वेळेवर निदान व उपचार केल्यास आरोग्य सुरळीत राहते, असेही त्यांनी नमूद केले.

## सुप्रीम कोर्टचा बीटी ॲक्ट रद्द करण्याबाबतचा अंतिम निर्णय 29 जुलै 2025 रोजी

**दै. प्रजा शासन न्यूज/ प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे दिल्ली – रिट याचिकेवर १६ मे रोजी सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. दोन्ही पक्षांचे युक्तिवाद ऐकून न्या. दीपक मिश्रा आणि न्या. प्रसन्नंत यांच्या खंडपीठाने विचारले की – "या कायद्याची गरजच काय आहे?" या खटल्यावर अंतिम सुनावणी २९ जुलै २०२५ रोजी होणार असून, त्यानंतर अंतिम निर्णय येईल. या संघर्षात अनेक वेळा पावसात, ऊनात संघर्ष करणाऱ्या कार्यकर्त्यांनी, विविध भिक्षूंनी, उपासक-उपासिकांनी अनेक अडचणींना तोंड देत आंदोलन चालू ठेवले. या लढ्यामुळे समाजात मोठे जागृतीचं वातावरण तयार झालं. भेद, धर्ममत, जातीय भेद यापलीकडे जाऊन बौद्ध संघटनांनी, कार्यकर्त्यांनी, विचारवंतांनी व अनेक संस्थांनी एकत्र येऊन आवाज उठवला. आपल्याला शहरांचे संरक्षण करण्यासाठी लोक, राज्य सरकार आणि सुप्रीम कोर्टाशी समजून घेऊन संवाद साधावा लागेल. हा लढा भावनात्मक असला तरी पुराव्यांसह मजबूत बाजू मांडणे आवश्यक आहे. जसजशी अंतिम तारीख जवळ येतेय, तसतसे समाजकार्य, प्रशासन, आणि कायद्याच्या बाजूने विचार करून सुप्रीम कोर्टात सर्व बाबी मांडणं गरजेचं आहे. हा लढा इतिहासात नोंदवला जाईल. पुढच्या पिढ्यांना कळेल की, आपण आपली भूमिका वेळेवर आणि समजूतदारपणे पार पाडली.**

# पक्षी तज्ञ अभ्यासक गोपलरावजी ठोसर यांची सुमित राठोड व रविंद्र गिमोणकर यांनी घेतली भेट

प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे नागू दि.२६ में २०२५ ला नागपूर प येथील प्रसिद्ध सोनेगाव येथील तलाव वाचविण्यासाठी सर्वात मोठे योगदान देणारे आणी तलाव वाचविण्यात यश मिळणारे पर्यावरण तज्ञ व पक्षी अभ्यासक ३० वर्षापेक्षा जास्त काळ माळढोक या पक्षीवर अभ्यास व कार्य करणारे आदरणीय श्री गोपालरावजी ठोसर सर नागपूर सराची भेट नागपूर राखीव पोलीस दलात कार्यरत असलेल्या सुमित राठोड व प्रा. लेखक साहीत्यक श्री रविंद्र गिमोणकर सर नागपूर यांनी घेतली सुमित राठोड हे आपले कर्तृत्व बजाऊन मागील सात आठ वर्षांपासून पर्यावरण व पक्षी संरक्षण संवर्धन संगोपन करिता कार्य करीत आहे या कार्य करायला आनखी प्रेरणा मिळावी या करिता प्रा. लेखक कवी साहीत्यक श्री रविंद्र गिमोणकर यांनी सुमित राठोड भेट घेतली ठोसर सर यांच्या माहीती नुसार आजच्या घडीला जगात साधारण १३० माळढोक पक्षी असतील यातील महाराष्ट्रात ५ ते ६ असु शकतात असे त्यांचे अभ्यास म्हणतात





शेतात जमीनीवर राहणारा हा पक्षी अत्यंत दुर्मिळ होत आहे प्रा.लेखक साहीत्यक श्री रविंद्र गिमोणकर सर नागपूर यांच्या मुळे आज सरांची भेट झाली पर्यावरण व पक्षी विषयी बरीच माहीती देवानं घेवान झाली ठोसर सराना आठवन म्हणुन गमिमोणर सर यांच्या हस्ते ठोसर सर यांना आपटा सोन्याचे वृक्ष भेट देण्यात आले त्यावेळी सौ. ठोसर मॅडम व पक्षीमित्र अनिरुद्ध भगत सर नागपूर आदी उपस्थित होते

# पावसाळ्यात विजांच्या कडकडाटात झाडाखाली उभे राहणे टाळा एक सावधगिरीचा इशारा

प्रतिनिधी पावसाळा हा निसर्गाचा एक रम्य ऋतू असला, तरी यामध्ये अनेक धोकादायक घटक लपलेले असतात. विजा कडाडणे, जोरदार वारे आणि मुसळधार पाऊस हे या ऋतूचे ठळक वैशिष्ट्य आहेत. विशेषतः विजांच्या कडकडाटाच्या वेळी काही चुका जीवघेण्या ठरू शकतात — त्यातीलच एक म्हणजे झाडाखाली उभे राहणे. विजा आणि झाडे — घातक संयोग जेव्हा वीज कोसळते, तेव्हा ती सर्वात उंच वस्तूंना प्राधान्य देते. झाडे ही बहुधा उंच असतात आणि त्यामुळे विजेच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरतात. विजा झाडावर कोसळल्यास विद्युत प्रवाह झाडाच्या सालीतून खाली पर्यंत पोहोचतो आणि झाडाखाली असलेली व्यक्ती विजेचा धक्का बसून गंभीर जखमी होऊ शकते, किंवा मृत्यूही ओढवू शकतो. शेतीकामात अधिक धोका शेतकरी वर्गासाठी हा धोका अधिक गंभीर असतो, कारण पावसाळ्यातील कामाच्या ओढीने अनेक वेळा शेतकरी शेतात असतो. वीज पडताना अनेक वेळा पाऊस सुरू असतो, त्यामुळे आपोआपच झाडाखाली उभे राहण्याचा मोह होतो. पण ही सवय अत्यंत धोकादायक आहे. सावधगिरीचे उपाय: विजांचा कडकडाट सुरू असताना उघड्यावर किंवा झाडाखाली उभे राहू नये. शक्य असल्यास सुरक्षित इमारतीमध्ये आश्रय घ्यावा. धातूच्या वस्तूंपासून दूर राहावे — यामध्ये छत्र्या, कुऱ्हाडी, फावडे, ट्रॅक्टर आदींचा समावेश होतो. मोबाइल फोन किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरणे टाळावे. शेतीकाम काही वेळ थांबवून सुरक्षित स्थळी थांबावे. शेवटी एकच सांगावेसे वाटते — निसर्गापुढे आपले काहीही चालत नाही, पण थोडी सावधगिरी आपला आणि आपल्या कुटुंबाचा जीव वाचवू शकते. पावसाळा आनंदाने अनुभवावा, पण काळजीपूर्वक!



# आणखी एका विवाहितेने जीवन संपवले, सासरच्या मंडळींना पोलिसांनी घातल्या बेड्या

पुणे मुळशी येथील वैष्णवी हगवणे हीने सासरच्या जाचाला कंठाळून जीवन संपवल्याचे प्रकरण ताजे असतानाच आणखी एका विवाहितेने स्वत:स संपवल्याची घटना उघडकीस आली आहे. या नाशिक येथील भक्ती अपूर्व गुजराथी ( ३७ ) या विवाहितेने सासरच्या जाच आणि मानसिक त्रासाला कंटाळून गळफास घेतल्याची घटना घडली आहे. या प्रकरणानंतर तिच्या माहेरच्या मंडळींना तिच्या मृतदेहाला ताब्यात घेण्यास नकार देत फलक झळकावून मोर्चा काढला होता. अखेर पोलिसांनी आश्वासन दिल्यानंतर



तिच्या मृतदेहावर काल अत्यंसंस्कार करण्यात आले.या प्रकरणात पसार झालेल्या पती,सासरे आणि सासू यांना अखेर अटक झाली आहे.भक्ती अपूर्व गुजराथी (३७) या विवाहितेने सासरच्या जाचाला कंटाळून गळफास घेत आपले जीवन संपवल्याने नाशिक येथे खळबळ उडाली होती.भक्तीच्या पालकांनी आपल्या मुलीचा सासरी छळ होत असल्याची तक्रार केली होती. भक्ती हीचे पती, नणंद आणि सासु आणि सासरे यांच्यावर भक्तीवला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला होता. त्यानंतर भक्ती हीचे पती आणि सासरीची मंडळी फरार झाली होती.

# फरसाण, चिकन ते तेल लावलेल्या चपात्या! वाल्मिक कराडची तुरुंगात बडदास्त, तुरुंगातून बाहेर आलेल्या रणजीत कासलेंचा दावा

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणात वाल्मिक कराड सध्या बीडच्या तुरुंगात आहे. यापूर्वी त्याला जिह्ला रुग्णालयात व्हीआयपी ट्रीटमेंट देण्यात येत आल्याचे समोर आले होते. प्रकरणात पोलीस दलातील कर्मचाऱ्यांवर कारवाई पण झाली होती. आता बीड तुरुंगात वाल्मिक अण्णाला स्पेशल ट्रीटमेंट देण्यात येत असल्याचा दावा बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले याने केला आहे. त्याच्या या दाव्याने एकच खळबळ उडाली आहे.
वाल्मिकला सर्व सोयी-सुविधा
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची 9 डिसेंबर 2024 रोजी निर्घृण हत्या झाली होती. त्यानंतर जनरेट्यापुढे झुकत पोलिसांनी तपास केला आणि प्रकरणातील आरोपींना अटक केली. कृष्णा आंधळे वगळता इतर सर्व आरोपी अटकेत आहेत. वाल्मिक कराड याला बीडमधील कारागृहात ठेवण्यात आले आहे. वाल्मिकला याठिकाणी व्हीआयपी ट्रीटमेंट देण्यात असल्याचा दावा कासले याने केला आहे. त्याला सर्व सोयी-सुविधा देण्यात आल्याचे कासलेने स्पष्ट केले आहे. आरोग्य सुधारते आणि सुरक्षितता वाढते. काही अडचणी काय आहेत? काही कामगारांना या योजनेबद्दल माहितीच नसते. नोंदणी करताना कधी कधी अडचण येते. काही योजना काही काळ थांबवल्या जातात. बांधकाम कामगार खूप मेहनती असतात. त्यांच्या मदतीसाठी सरकारने चांगल्या योजना बनवल्या आहेत. कामगारांनी नोंदणी करून या योजनेचा फायदा घ्यावा. यामुळे त्यांचे आयुष्य आणि कुटुंबाचे जीवन सुधारेल. समाजही पुढे जाईल. फरसान, चिकन, व्हीआयपी ट्रीटमेंटबडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले हा जामिनावर बाहेर आला आहे. त्याने बाहेर येताच शनिवारी सोशल मीडियावर एक व्हिडिओ पोस्ट केला. त्यात त्याने वाल्मिकला तुरुंगात सर्व सोयी-सुविधा मिळत असल्याचा दावा केला. वाल्मिकला फरसान, तेल लावलेल्या चपात्या, बुधवारी आणि रविवारी चिकन दिले जात असल्याचा दावा कासले याने केला.वाल्मिकच्या जीवाला धोका
वाल्मिक कराडला तुरुंगात सर्व सोयी-सुविधा मिळत आहे. त्याला नागपूर अथवा पुण्याच्या तुरुंगात हलवा. त्याच्या जीवाला बीड कारागृहात धोका असल्याचा दावा कासले याने केला. अंजली दमानिया, करुणा मुंडे, तृप्ती देसाई यांच्याकडे याविषयीची त्यांनी विनंती केल्याचे, त्याने सांगितले. तुरुंगात गेल्यावर आपल्याला प्लास्टिकच्या कपात चहा देण्यात आला. तर वाल्मिकला खास कपात चहा देण्यात आला, याची आठवण त्याने यावेळी करून दिली. तर वाल्मिकच्या जीवाला धोका असल्याचा दावा कासले याने केला आहे.

# श्री.विनायकराव माध्यमिक विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार दहावीनंतर काय ? या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन

पाटोदा | प्रतिनिधी
श्री विनायकराव माध्यमिक विद्यालय, वैध्यकिन्ही ता.पाटोदा जि. बीड या शाळेने नुकत्याच घोषित झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत उज्वल यश मिळवले असून शाळेचा निकाल १००% टक्के लागलेला असून विद्यालयातून 29 विद्यार्थी विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाले आहेत कु.जोगदंड सुजाता बबन 93.40% गुण घेऊन सर्वप्रथम आली आहे. चिरंजीव. बांगर विशाल त्रिंबक ९३% टक्के गुण घेऊन दुतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. चिरंजीव. बावणे पार्थ मधुकर ९२.२० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती पात्र कु.श्रेया चौरे व कु. प्रेरणा चौरे यांचाही शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गुणगौरव करण्यात आला. याशिवाय कुमारी बावणे अंकिता सिताराम 92%कु. बाबर साक्षी सखाराम 90% अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले असून सदरील गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ प्रसंगी वैद्यकिन्हीचे सरपंच मा. श्री अतुलजी मकाळ, सोनेगाव येथील इंजिनियर मा. श्री. संभाजी चौरे साहेब संस्था सचिव मा. श्री. भागवत (अण्णा) आजबे संस्था अध्यक्ष मा. श्री. बाजीराव (अण्णा) बांगर संस्था उपाध्यक्ष मा.श्री. भाऊसाहेब भाऊ शिंदे, संचालक मा.श्री. नारायण भाऊ वाघमारे साहेब व श्री. मधुकर बापू जगताप उपस्थित होते सरपंच साहेबांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम जिद्द,चिकाटी ,आणि आई-वडिलाच्या कष्टाची,परिस्थितीची जाणीव ठेवून सातत्याने अभ्यास केल्यास शब्बासकीची थाप नक्कीच मिळते या स्वरूपाचे मार्गदर्शन केले. इंजिनीयर मा. श्री. संभाजी चौरे साहेब यांनी मार्गदर्शन करताना करताना ग्रामीण भागातील विद्यार्थी कठोर परिश्रम करणारे असतात हे अनेक स्पर्धा परीक्षेच्या निकालातून दिसून आले असे म्हटले, दहावी नंतर पॉलिटेक्निक च्या माध्यमातून इंजीनियरिंग कडे येता येते व आपले करिअर उत्तम प्रकारे



घडू शकते. याबाबत सखोल मार्गदर्शन केले मुख्याध्यापक श्री. बांगर सर, मकाळ सर, कोचाळे सर, आजबे सर, वळे सर, जिरेकर सर, मोरे सर, श्रीमती.कवडे मॅडम, शिक्षकेतर कर्मचारी आजी माजी विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी प्रस्ताविक आजबे सर यांनी तर सूत्रसंचालन बांगर सर यांनी शेवटी श्री. मोरे सर यांनी आभार व्यक्त केले. यावेळी सर्वांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.




दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर



## आंतरराष्ट्रीय

# पाकिस्तानात कठपुतली सरकार, चर्चा करणे निरर्थक, इम्रान खान यांनी शाहबाज यांना दाखवला आरसा

भारताच्या ऑपरेशन सिंदूरमुळे पाकिस्तानची पोलखोल झाली आहे. पाकिस्तानची जगभर नाचक्की झाली आहे. पाकिस्तानात पंतप्रधानापेक्षा लष्करप्रमुख महत्वाचे असल्याचे पहलगाम हल्ल्याप्रसंगी दिसून आले. आता पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांनी शाहबाज सरकारला घरचा आहेर दिला आहे. पाकिस्तानात कठपुतली सरकार आहे. त्या सरकारसोबत चर्चा करणे निष्फळ आहे. त्यामुळे चर्चा फक्त पाकिस्तानच्या लष्करासोबत करणार असल्याचे इम्रान यांनी म्हटले.

काय म्हणाले इम्रान खान? पाकिस्तान तहरीक-ए-इंसाफ (पीटीआय) चे संस्थापक इम्रान खान ऑगस्ट 2023 पासून कारागृहात आहे. त्यांच्यावर अनेक खटले सुरु आहे. एप्रिल 2022 मध्ये त्यांचे सरकार पाडल्यानंतर त्यांना अनेक प्रकरणात अडकवण्यात आले. इम्रान खान यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, कठपुतली असलेल्या पाकिस्तान मुस्लीम लीग-नवाज (पीएमएल-एन) सरकारसोबत चर्चा करणे निरर्थक आहे. या अवैध सरकारकडे काहीच अधिकार नाही. खोटे अधिकार मिरवणे, हाच एक



कलमी कार्यक्रम या सरकारचा आहे. खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रकार

इम्रान खान यांनी पुढे म्हटले की, चर्चा फक्त सत्तेत असणाऱ्या लोकांसोबतच (सैन्य अधिकारी) केली जाणार आहे. ही चर्चा फक्त राष्ट्रीय हिताच्या मुद्यांवर होणार आहे. माझा हेतू चांगला आहे. यामुळे मला अडचणींची भीती वाटत नाही. माझा आणि माझ्या पक्षातील इतर सदस्यांविरुद्ध निराधार राजकीय खटले दाखल केले जात आहे. जबरदस्तीने अपहरण करणे आणि जबरदस्तीने घेतलेल्या पत्रकार परिषदा हे पक्षातील सदस्यांना पक्षापासून दूर करण्याचा प्रयत्न आहे. ते सीसीटीव्ही सार्वजनिक का नाही?

इम्रान यांनी पाकिस्तानात कायदाच शिल्लक नसल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले, पाकिस्तानात पूर्णपणे जंगल राज आहे. 9 मे 2023 रोजी घडलेला प्रकार दडपशाही आहे. पीटीआयवर दबाब आणण्याचा हा प्रयत्न आहे. त्या दिवसाचे सीसीटीव्ही फुटेज अजूनही सार्वजनिक करण्यात आले नाही. त्यामुळे सत्य बाहेर येत नाही, असा आरोप इम्रान यांनी केला. 9 मे 2023 रोजी इम्रान यांना पाकिस्तान लष्कराच्या अर्धसैनिक दलाने अटक केली होती.

# ऑपरेशन सिंदूरबद्दल मोदींची मन की बात

आज संपूर्ण देश दहशतावादाविरुद्ध एकवटलं आहे. प्रत्येकाच्या मनात दहशतावादाविरोधात संताप आहे. आपल्याला हा दहशतवाद संपवायचा आहे, हा आज प्रत्येक भारतीयाचा संकल्प आहे. ऑपरेशन सिंदूरदरम्यान आपल्या सैन्याने दाखवलेल्या शौर्याचा प्रत्येक भारतीयाचा अभिमान आहे", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी 'मन की बात' या कार्यक्रमात म्हणाले. शनिवारी त्यांनी या कार्यक्रमाद्वारे जनतेशी संवाद साधला. यावेळी त्यांनी दहशतवाद आणि ऑपरेशन सिंदूर हे दोन मुद्दे अधोरेखित केले."काही दिवसांपूर्वी मी रायझिंग नॉर्थ ईस्ट समिटला गेलो होतो. तिथे मला अष्टलक्ष्मी महोत्सवाची माहिती मिळाली. सिक्कीमचे डॉ. चेवांग नोरबू भुटिया यांनी क्राफ्टेड फायबर्सला ब्रँड बनवलं. त्यांनी सिक्कीमच्या विणकाम परंपरेला एक नवी दिशा दिली. पेशाने पशुवैद्य असलेल्या भुटिया यांनी अनेक ग्रामीण महिलांना या कामाशी जोडलं. याअंतर्गत हस्तकलेच्या माध्यमातून शाल, स्टोल, हातमोजे आणि मोजे बनवले जातात", असं ते म्हणाले. ऑपरेशन सिंदूरबद्दल बोलताना ते पुढे म्हणाले, "आपल्या सैन्याने दाखवलेल्या शौर्याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे. त्यांनी सीमेपलीकडील दहशतवाद्यांचे अड्डे ज्या अचूकतेने उद्ध्वस्त



केले ते थक्क करणारं आहे. ऑपरेशन सिंदूरने जगभरातील दहशतवादाविरुद्धच्या लढाईत नवा आत्मविश्वास आणि उत्साह दिला आहे. ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक लष्करी मोहीम नव्हती, तर आपल्या दृढनिश्चयाचं, धैर्याचं आणि बदलत्या भारताचं चित्र आहे. या चित्राने संपूर्ण देशाला देशभक्तीच्या भावनांनी भरलंय आणि तो तिरंग्यातही रंगवला गेलाय. भारताने बनवलेल्या शस्त्रास्त्रांचं, उपकरणांचं आणि तंत्रज्ञानाचं बळ या ऑपरेशन सिंदूरदरम्यान पहायला मिळालं. या विजयात आपल्या अभियंत्यांच्या, आपल्या तंत्रज्ञांच्या घामाचा सहभाग आहे."'मन की बात'मध्ये मोदींनी एका गावाचीही गोष्ट सांगितली. ते म्हणाले, "बसने प्रवास करणं ही सर्वसामान्य गोष्ट आहे. पण मी तुम्हाला अशा एका गावाबद्दल सांगू इच्छितो जिथे पहिल्यांदाच बस आली. तिथले लोक वर्षानुवर्षे या दिवसाची प्रतीक्षा करत होते. जेव्हा बस पहिल्यांदाच या गावात पोहोचली, तेव्हा तिथल्या लोकांनी ढोल वाजवून त्याचं स्वागत केलं. हे गाव महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील आहे. काटेझारी असं या गावाचं नाव आहे. हे गाव माओवाद्यांच्या हिंसाचाराने प्रभावित होतं. इथं पहिली बस धावल्याने संपूर्ण परिसरात बदल जाणवत आहे. इथली परिस्थिती झपाट्याने सर्वसामान्य होत आहे." यावेळी त्यांनी दंतेवाडा जिल्ह्याच्या दहावी आणि बारावीच्या उत्कृष्ट निकालाबद्दल आनंदही व्यक्त केला.

## सनरायजर्स हैदराबादचा 110 धावांनी धमाकेदार विजय, गतविजेत्या केकेआरचा पराभवाने शेवट

सनरायजर्स हैदराबादने पॅट कमिन्स याच्या नेतृत्वात गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्सवर मोठ्या फरकाने मात करत आयपीएलच्या 18 व्या मोसमातील शेवट विजयाने केला आहे. हैदराबादने केकेआरचा 110 धावांनी धुव्वा उडवला. हैदराबादने केकेआरसमोर विजयासाठी 279 धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र हैदराबादच्या गोलंदाजांनी गतविजेत्यांना 18.4 ओव्हरमध्ये 168 रन्सवर गुंडाळलं. हैदराबादने यासह आयपीएलच्या इतिहासातील त्यांचा दुसरा सर्वात मोठा विजय साकारला. तसेच हैदराबादने या विजयासह या हंगामात विजयी हॅटट्रिकही पूर्ण केली. हैदराबादने त्यांच्या साखळी फेरीतील शेवटचे 3 सामने जिंकले. कोलकाताचे फलंदाज डोंगराएवढ्या आव्हानाचा पाठलाग करताना फ्लॉप ठरले. सुनील नारायण, मनीष पांडे आणि हर्षित राणा या तिघांचा अपवाद वगळता इतर कुणालाही 30 पेक्षा अधिक धावा करता आल्या नाहीत. सुनील नारायण याने 31, हर्षित राणा याने 34 तर मनीष पांडे याने सर्वाधिक आणि 37 धावा केल्या. दोघांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. तर दोघे आले तसेच परत गेले अर्थात भोपळाही फोडू शकले नाहीत. सनरायजर्स हैदराबादच्या जयदेव उनाडकट, एशान मलिंगा आणि हर्ष दुबे या त्रिकुटाने केकेआरचं पॅकअप केलं. या तिघांनी प्रत्येकी 3-3 विकेट्स घेतल्या.

## शनिवारी डच्चू मात्र रविवारी सर्फराज इंग्लंडमध्ये, मुंबईकर फलंदाजाची 3 सामन्यांसाठी निवड

आयपीएलचा 18 वा हंगाम शेवटच्या टप्प्यात आहे. साखळी फेरीतील अखेरचे सामने खेळवण्यात येत आहेत. त्यानंतर प्लेऑफचा थरार रंगणार आहे. त्यानंतर टीम इंडिया इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे.टीम इंडिया या दौऱ्यात इंग्लंड विरुद्ध 5 सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी बीसीसीआय निवड समितीने शनिवारी 24 मे रोजी 18 सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. रोहित शर्मा याच्या निवृत्तीनंतर शुबमन गिल याला भारतीय संघाचा कर्णधार करण्यात आलं. तर ऋषभ पंत याला उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली. करुण नायर याचं 8 वर्षांनंतर कमबॅक झालं. तसेच साई सुदर्शन याला पहिल्यांदाच संधी देण्यात आली. मात्र सर्फराज खान याला डच्चू देण्यात आला.

# आता मदरशांमध्ये घुमणार ऑपरेशन सिंदूरचा आवाज, नवा निर्णय काय?

पहलगामध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमध्ये एअर स्ट्राईक केला, या एअर स्ट्राईकमध्ये दहशतवाद्यांचे 9 अड्डे उद्ध्वस्त झाले, या हल्ल्यामध्ये 100 पेक्षा अधिक दहशतवाद्यांचा खात्मा झाला, ऑपरेशन सिंदूरची पाकिस्तानने चांगलीच धास्ती घेतली. कर्नल सोफिया कुरैशी यांची ऑपरेशन सिंदूरमध्ये महत्त्वाची भूमिका होती. दरम्यान आता जोधपूर मदरसा बोर्ड एक ऐतिहासिक निर्णय घेण्याच्या तयारीमध्ये आहे. या अंतर्गत भारतीय




सैन्याची साहसी मोहीम 'ऑपरेशन सिंदूर' बाबतच्या माहितीचा समावेश हा मदरसा अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा विचार सुरू आहे. याबाबत बोलताना बोर्डाचे अध्यक्ष एमडी चोपदार म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरमधून मुस्लिम मुलींनी प्रेरणा घ्यावी, त्यांना कर्नल सोफिया कुरैशी यांच्या कार्याची माहिती व्हावी यासाठी मदरसा अभ्यासक्रमात ऑपरेशन सिंदूरबाबतच्या माहितीचा समावेश करण्याचा विचार सुरू आहे. या निर्णयामुळे केवळ देशभक्तीच वाढणार नाही, तर मदरसामध्ये शिकणाऱ्या मुलींना प्रेरणा मिळेल, असं चोपदार यांनी म्हटलं आहे.एमडी चोपदार, जे स्वतः एका सैन्य कुटुंबातील आहेत, यावेळी बोलताना ते म्हणाले की, मी स्वत: एका सैन्य कुटुंबातील आहे. देशासाठी त्याग करणं, बलिदान देणं काय असतं हे मला चांगलं माहीत आहे. मला वाटतं की जर आम्ही ऑपरेशन सिंदूरबाबत मुलींना माहिती दिली तर त्या देखील निश्चितपणे कर्नल सोफिया कुरैशी यांच्याप्रमाणेच देशाचं नाव उंचावतील, त्यांना देशभक्तीची प्रेरणा मिळेल, असं चोपदार यांनी म्हटलं आहे.पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला होता, या हल्ल्यामध्ये 26 पर्यटकांचा मृत्यू झाला, या हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तामध्ये प्रचंड तणाव वाढला. या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतानं ऑपरेशन सिंदूर राबवलं, भारतानं पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमध्ये एअर स्ट्राईक केला. या एअर स्ट्राईकमध्ये दहशतवाद्यांचे 9 ठिकाणं उद्ध्वस्त झाले,

# रशियाचा युक्रेनवर सर्वात मोठा हवाई हल्ला, युक्रेनची वायूसेनेने २६६ ड्रोन आणि ४५ क्षेपणास्त्र निकामी

रशियाने काल रात्री युक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हवाई हल्ला केला आहे. यात 367 ड्रोन आणि मिसाईल विविध शहरावर डागली. या भीषण हल्ल्यात 13 लोकांचे जीव गेले आहेत. जायटॉमिरमध्ये तीन मुलांचाही मृत्यू झाला आहे. या हल्ल्यात डझनावरील लोक ठार झाले आहेत. हल्ल्याच्या रोख किव, खारकीव, मायकोलाईव्ह, टर्नोपिल आणि खमेलनित्सकी सारखी शहर आली आहेत. झेलेन्स्की अमेरिकेवर संतापले या हल्ल्यात खमेलनित्स्कीमध्ये चार जणांचा मृत्यू झाल्याचे म्हटले जात आहे तर राजधानी किवमध्ये ११ जण



जखमी झाले, शुक्रवारी झालेल्या आणखी एका मोठ्या ड्रोन आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर लागोपाठचा हा दुसरा हल्ला आहे. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकेच्या कमजोर रिएक्शनवर जोरदार टीका केली आहे आणि रशियाविरुद्ध कठोर निर्बंध घालण्याची मागणी अमेरिका आणि उर्वरित जगाकडे आहे. 'दबावाशिवाय काहीही बदल होणार नाही' युक्रेनियन राष्ट्राध्यक्षांचे चीफ ऑफ स्टाफ आंद्रेई येरमाक यांनी टेलिग्रामवर एक पोस्ट टाकली आहे. त्यात त्यांनी "दबावाशिवाय काहीही बदलणार नाही," असे म्हटले आहे. रशिया आणि त्यांची मित्र राष्ट्रं पाश्चात्य देशांतही अशाच प्रकारे नृशंस हल्ल्याची योजना आखतील. मॉस्को तोपर्यंत लढले जोपर्यंत त्यांच्याकडे शस्त्रे तयार करण्याची क्षमता आहे. दुसरीकडे, रशियाने उलट दावा केला की त्यांनी अवघ्या चार तासांत ९५ युक्रेनियन ड्रोन पाडले आहेत, त्यापैकी १२ मॉस्को शहराजवळ होते. हा संघर्ष आणखीन चिघळताना दिसत आहे.. या हल्ल्यादरम्यान, शांतता चर्चेचा मार्ग मोकळा होण्यासाठी युक्रेनने ३० दिवसांच्या युद्धबंदीचा प्रस्ताव दिला आहे. हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर, दोन्ही देशांनी प्रत्येकी १,००० कैद्यांच्या देवाणघेवाणीची प्रक्रिया देखील पूर्ण केली आहे. सणाचे दिवस संपल्यानंतर हल्ले सुरुरशियाने गुड फ्रायडे निमित्ताने ख्रिस्ती धार्मिक सणानिमित्ताने युक्रेनवर हल्ले न करण्याचा संकेत पाळला होता. मात्र हा सणाचे दिवस संपल्यानंतर लागलीच पुन्हा रशियाने हल्ले सुरु केल्याने आता या युद्धाला गंभीर वळण लागले आहे. मध्यंतरी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांना अमेरिकेत चर्चेला बोलावून युद्ध थांबविण्याचा सल्ला दिला होता.त्यावर झेलेन्स्की यांनी रशिया हल्ले थांबवले याची गॅरंटी कोण देणार असा सवाल करीत या चर्चेतून माघार घेतली होती

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com